रायगड जिल्ह्यात वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
नामांकित टाटा कंपनीच्या कॉपर वॉटर, फ्रुट, ज्यूसेस, ग्लुकोज ड्रिंक इत्यादी उत्पादना साठी तालुका निहाय वितरक व घाऊक विक्रेता नेमणे आहेत.
-: संपर्क :-
विहा एन्टरप्रायजेस
9004563266
8888570393

दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

दैनिक रायगड नगरी
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com

● वर्ष १७ वे ● अंक १७७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२७ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

### आ.प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनाला यश

# उड्डाण पुलाच्या काँक्रीटीकरणासाठी २.४८ कोटीची निविदा प्रसिद्ध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली व भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या पुढाकाराने झालेल्या रास्ता रोको आंदोलनाला मोठे यश आले आहे. त्या अनुषंगाने नवीन पनवेल उड्डाणपुल आणि एचडीएफसी सर्कल काँक्रीटीकरण करण्यासाठी सिडकोने ०२ कोटी ४८ लाख रुपयांच्या कामाची बोली मागवणारी सूचना प्रसिद्ध केली आहे.**

नवीन पनवेल माथेरान महामार्गाला जोडणाऱ्या या पुलामुळे पनवेल तालुक्यातील नेरे आणि माथेरानकडे जाणारी शेकडो गावे, वाड्या, पाडे जोडली असून दळणवळणाचा हा प्रमुख मार्ग आहे. या उड्डाण पुलाची पावसामुळे दुरावस्था झाली होती. या खड्ड्यामुळे रोज अपघात होऊन अनेक जण जखमी झाले असल्याच्या घटना घडल्या आहेत. या पूलावरील रहदारीचा विचार करता पूलाच्या उतारावरील दोन्ही बाजूला सिमेंट कॉंकेटीकरण होणे गरजेचे असताना सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने हा उड्डाण पूल खड्डे मुक्त करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी भर पावसामध्ये पूलावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.



भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हिरीरीने सहभाग घेत पावसात भिजत रस्ता अडवल्यावर सिडकोचे बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंत्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना भेटून आम्ही दोन महिन्यात टेंडर प्रोसेस सुरू करतो तुम्ही आंदोलन मागे घ्या सांगत होते. पण त्याला नकार देऊन सर्वांनी पावसात रस्त्यावर ठाण मांडले तर काहीजण रस्त्यावर झोपले. शेवटी सिडको प्रशासन या आंदोलनापुढे नमले असून सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे यांनी येत्या रविवार पर्यत या उड्डाणपुलावरील खड्डे भरण्यात येतील तसेच आठवड्याभरात या पुलाच्या चारी बाजूंचे कॉंकिटीकरण करण्याची निवीदा काढण्यात येईल असे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांना फोन करून दिले. त्यानंतरच भरपावसामध्ये सुरु असलेले आंदोलन मागे घेण्यात आले होते. मात्र जर येत्या आठवड्या भरात हे काम झाले नाही तर आमच्यासाठी आंदोलनाचा मार्ग मोकळा आहे असा इशारा आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी झालेल्या रस्तारोको आंदोलनावेळी सिडको प्रशासनाला दिला होता.


त्या अनुषंगाने सिडकोने न्यू पनवेल आरओबी येथे डेक स्लॅबच्या रिसरफेसिंगसह जोडरस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे या शीर्षकाखाली ०२ कोटी ४८ लाख ६९ हजार ८३९ रुपयांचे काम करण्यात येणार असून बोली मागवणारी सूचना प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे वाहनचालक, प्रवासी यांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले जात आहेत.

खड्डे अपघातांना आमंत्रण होते. त्यामुळे या संदर्भात आंदोलनाची भूमिका आम्ही घेतली. नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आम्ही कधीही मागे पडत नाही. त्यामुळे भर पावसात आंदोलन करताना आम्ही कदापिही माघार घेतली नाही. शेवट्पर्यंत सिडकोचे अधिकारी योग्य कार्यवाहीची भूमिका घेत नाही तो पर्यंत आंदोलन करीतच राहिलो. त्या अनुषंगाने या आंदोलनाला यश आले त्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि सिडकोचे आभार मानतो.

**- संदीप पाटील, उपाध्यक्ष भाजप, पनवेल शहर**

### नारायण राणेंना सुप्रीम कोर्टाचाही दणका

# मुंबईतील अधीश बंगल्यातील अनधिकृत बांधकाम पडणारच



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या मुंबईच्या जुहू परिसरातील अधीश बंगल्यातील अनधिकृत बांधकामाला संरक्षण देण्यास सर्वोच्च न्यायालयानेही नकार दिला आहे. गेल्याच आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाने अधीश बंगल्यातील बेकायदा बांधकाम नियमित होऊ शकत नाही, असे सांगत हे बांधकाम पाडण्याचा आदेश दिला होता. तसेच नारायण राणे यांना १० लाख रुपयांचा दंडही ठोठावला होता. या निर्णयाविरोधात नारायण राणे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, इथेही त्यांच्या पदरी निराशाच पडली. सर्वोच्च न्यायालयाने मुंबई हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे आता नारायण राणे यांच्या अधीश बंगल्यावरील कारवाई अटळ मानली जात आहे.

नारायण राणे यांच्या बंगल्यातील बांधकाम नियमित करण्यासंदर्भातील याचिका फेटाळत असताना हायकोर्टाने मुंबई महानगरपालिकेलाही महत्त्वपूर्ण आदेश दिले होते.

पुढील दोन आठवड्यांत अतिरिक्त बेकायदा बांधकाम तोडण्याची कारवाई करून नंतरच्या एक आठवड्यात कृती अहवाल सादर करा, असे निर्देश हायकोर्टाने दिले होते. पालिकेने ज्येष्ठ वकील अनिल साखरे यांच्यामार्फत मांडली होती. त्यानंतर ‘मोठ्या प्रमाणात बेकायदा बांधकाम असल्याबाबत न्यायालयाकडूनही शिक्कामोर्तब झालेले असताना पालिकेने या दुसऱ्या अर्जाला काहीच विरोध दर्शवल्याचे दिसत नाही. त्यामुळे आता आम्हालाच योग्य ती दखल घ्यावी लागेल’, असे नमूद करत न्या. रमेश धनुका व न्या. कमल खाटा यांच्या खंडपीठाने राणे यांची याचिका फेटाळून लावत कालका रिअल इस्टेट कंपनीला १० लाखांचा दंडही ठोठावला होता.

# नवी मुंबईतील खिंडार पवारांनी दहा दिवसात बुजवले

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

राज्यात सत्तानंतर झाल्यानंतर राजकीय पक्षा–तील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वतःच्या सोयीनुसार इकडून तिकडे जाणं पसंत केलं. काही दिवसांपूर्वी नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष अशोक गावडे यांनी देखील राष्ट्रवादीचे घड्याळ काढून शिंदे गटात प्रवेश केला. त्यानंतर तातडीने जिल्हाध्यक्षपदी नवीन नियुक्ती करत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी खिंडार बुजवण्याचा प्रयत्न केला आहे.

गावडेंच्या पक्षांतराच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसचं कार्यकर्त्यांचं जाळं अधिक घट्ट व्हावं, या दृष्टिकोनातून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व महिला प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण यांनी नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी नगरसेविका सलूजा सुतार यांची नवी मुंबईच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करत पक्षात समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे.

सलूजा सुतार ह्या अनुभवी व अभ्यासू लोकप्रतिनिधी असून त्यांचे त्यांच्या प्रभागासह संपूर्ण नवी मुंबईमध्ये लक्ष असल्याचं बोललं जातं. सलूजा सुतार यांच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल नवी मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. उद्या २७ सप्टेंबर रोजी सलूजा सुतार यांना राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा विद्या चव्हाण या नियुक्त पत्र देणार आहेत असे स्वतः विद्या चव्हाण यांनी सांगितले.

१६ सप्टेंबरला नवी मुंबईचे जिल्हाध्यक्ष अश–ोक गावडे यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह शिंदे गटात प्रवेश केला त्यांच्या समवेत त्यांच्या कन्या आणि माजी नगरसेविका स्वप्ना गावडे यांनीही शिंदे गटाचे सदस्यत्व स्वीकारले. यावेळी नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणीवरील सदस्यांनी व अनेक तालुकाध्यक्ष, वार्ड अध्यक्ष आणि कार्यकर्त्यांनी गावडे यांच्यासह शिंदे गटात प्रवेश केला. यामुळे आधीच .../२

# वृद्ध इसमाची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून कोणत्यातरी धारदार हत्याराने एका ८० वर्षीय वृद्ध इसमाची हत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील पोयांजे कडून पाली बुद्रुक येथे जाणाऱ्या रस्त्यावर वालीचा डोह येथे घडली आहे.

पांडुरंग मऱ्या मते वय ८० वर्षे राहणार पोयंजे असे या मयत वृद्ध इसमाचे नाव असून त्याची कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून कोणत्यातरी धारधार हत्याराने त्यांच्या कपाळावर चेहऱ्यावर व डोक्याच्या पाठीमागे वार करून त्यांना जीवे ठार मारले आहे. त्यानंतर त्यांचा मृतदेह पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने वाहत्या पाण्यात टाकून दिला आहे या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील,सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर,पोलीस निरीक्षक गुन्हे अंकुश खेडकर व त्यांचे पथक घटनास्थळी रवाना झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खत कुंडी प्रकल्प राबविण्यासाठी खत कुंड्या बांधणे व प्रशिक्षित कामगारांची नेमणूक करा

### माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांची मागणी


**दै.रायगड नगरी । पनवेल**



स्वच्छ अमृत महोत्सव अंतर्गत महापालिका क्षेत्रातील विविध प्रभागात आणि विभागात खत कुंडी प्रकल्प राबविण्यासाठी खत कुंड्या बांधणे आणि त्याकामी प्रशिक्षित कामगारांची नेमणूक करण्याची मागणी पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यानी आयुक्तांकड़े निवेदनाद्वारे केली आहे.

अमृत महोत्सव २०२२–२३ या वर्षा करीता पनवेल महानगरपालिकेला केंद्र शासनाकडून आर्थिक निधी मिळणार आहे. पालिका क्षेत्रातील कचऱ्याचे वर्गीकरण करून ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करावी. त्यासाठी अमृत महोत्सव अंतर्गत प्रत्येक प्रभागात आणि विभागात खत कुंड्यांची आवश्यकता आहे. खतकुंड्या बांधून कचरा गोळा आणि वर्गीकरण करून त्यापासून खत निर्मित करण्यासाठी प्रशिक्षित कामगारांची एक वेगळी टीम कार्यरत ठेवावी. या खताचा योग्य वापर होउ शकतो. प्रत्येक प्रभागात निदान १० खत कुंड्या बांधून त्यावर प्रत्येकी एका खत कुंडी मागे ५ कामगारांची नियुक्ती करण्यात यावी. अशी मागणी माजी विरोधी पक्षनेता प्रितम जनार्दन म्हात्रे यानी पनवेल महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.

# रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज देवघटी बसले



**दै.रायगड नगरी । रोहा**

देशात ज्या दोन देवस्थानांना पोलिस मानवंदना देण्याची प्रथा, परंपरा ब्रिटीश काळापासुन सुरू आहे त्यापैकी एक असलेले रायगड वासियांचे श्रध्दास्थान आणि रोहयाचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज सोमवारी मंगलमय वातावरणात विधिवत देवघटी बसले आणी महाराजांच्या नवरात्रोत्सवास मोठया उत्सात प्रारंभ झाले.

रोहा शहराच्या पश्चिम बाजुला हनुमान टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या सुंदर आणि भव्य मंदिरामध्ये गाभाऱ्यात श्री धाविर महाराज, कालिका माता, बहिरीबुवा वाघबाप्पा मागे तीन वीरा यांचे स्थान आहे. व मंदिराबाहेर महाराजांचा अंगरक्षक चेडा देवाचे स्थान आहे.

अपुर्व अशा उत्साहामध्ये सुरू झालेल्या या उत्सवाची सांगता दसऱ्याच्या दुसऱ्या दिवशी रायगड पोलिसांच्या मानवंदने नंतर निघणाऱ्यां महाराजांच्या पालखी सोहळ्याने संपन्न होणार आहे. महाराजांचा पालखी सोहळा अभूतपूर्व व सर्वांच्या डोळ्याचे पारणे फेडणारा असाच असतो. शहरल प्रत्येक आळीमध्ये जल्लोषात व पारंपरिक पद्धतीने पालखीचे स्वागत केल जाते. शहरात सर्वांना दर्शन देत पालखी दुसऱ्या दिवशी मंदिरात पोहचते. श्री धाविर देवस्थान नवरात्र उत्सव समिति व ट्रस्ट चे पदाधिकारी आणि रोहेकर नागरिक व भक्तगण पालखी सोहळयासाठी परिश्रम घेतात. महाराजांचा पालखी सोहळा म्हणजे रोहा - अष्टमीकरांचा कौटुंबिक धार्मिक सोहळाच मानला जातो.

हे धाविर महाराजा समस्त रोहावासिय ग्रामस्थांनी श्रध्देने आणि पारंपारीक पध्दतीने तुझा नवरात्रोत्सव मांडला आहे, या उत्सवामध्ये आमच्या हातुन चांगली सेवा होईल.. काही चुका सुध्दा होतील, पण महाराजा हा उत्सव गोड मानून घे तुझ्या गावाला संकटापासून दूर ठेव असे देवस्थानचे पुजारी वरणकर यांनी श्री धाविर देवस्थानचे विश्वस्थ, पदाधिकारी, कार्यकर्ते आणी शेकडो धाविरभक्तांच्या उपस्थितीत देवाकडे गाऱ्हाणे मांडले आणी अक्षतांची उधळण देवावर होत ग्रामदैवत श्री धाविर महाराजांच्या उत्सवास मोठ्या उत्साहात शुभारंभ झाला. यावेळी गोंधळयांची आरती, विविध वाद्य आणि घंटानादाने आसंमंत दुमदुमून टाकणाऱ्यां मंगलमय वातावरणात ग्रामदैवताची महाआरती संपन्न झाली.

यावेळी मंदिरात विश्वस्थ मंडळाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश कोळी, सरचिटणीस भुषण भादेकर, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, समीर शेडगे, विश्वस्त नितिन परब, विजयराव मोरे, आप्पा देशमुख, सुभाष राजे, समीर सकपाळ, प्रकाश पवार, महेश सरदार, संदीप सरफळे, अमित उकडे, शैलेश रावकर, निलेश शिर्के, रवींद्र चाळके, सूर्यकांत कोलाटकर, प्रकाश पाटणकर, दत्ता जगताप, श्रीनिवास वडके, सचिन चाळके, रमेश साळवी, भालचंद्र पवार आदींसह उत्सव समितीचे पदाधिकारी आणि प्रमुख मान्यवर उपस्थित होते. माजी आमदार अनिल तटकरे यांनी मंदिरात उपस्थिती लावून महाराजांचे दर्शन घेतले.

या उत्सवानिमित्त मंदिराचा परिसर विविध रंगी फुलांच्या सजावटीने सजविण्यात आले आहे.. सुंदर रांगोळयांनी वातावरण प्रसन्न झाले असून मंदिरात प्रवेश द्वार, रांगोळी व फुलांची आरास आकर्षक अशी करण्यात आली आहे.

श्री.धाविर महाराजांचा नवरात्रोत्सव अतिशय भक्तिमय व जल्लोष पूर्ण वातावरणामध्ये उत्सव साजरा होतो. शहरातील प्रत्येक आळीला प्रहराचे जागरण करण्याचा बहूमान असतो. सकाळ, सायंकाळ व रात्री १२ वाजताच्या आरतीलाही मंदिरात प्रचंड गर्दी होते.




# दुखणे मोठे, दिलासा तात्पुरता

गेले काही महिने चित्रपटगृहांपासून दुरावलेल्या प्रेक्षकांना पुन्हा एकदा ७० एमएमची भुरळ पाडण्यासाठी राष्ट्रीय सिनेमा दिनाचा एक अनोखा प्रयोग सिनेसृष्टीने २३ सप्टेंबरला करून पाहिला. केवळ ७५ रुपयांमध्ये चित्रपट पाहाण्याची संधी या निमित्ताने प्रेक्षकांना देण्यात आली. आश्चर्य म्हणजे सिनेनिर्मात्यांचा हा प्रयोग तिकीट खिडकीवर 'हाउसफुल्ल' ठरला. सगळे प्रयोग करूनही प्रेक्षक सिनेमागृहांकडे येत नसल्यामुळे भविष्यात सिनेमागृहेही इतिहासजमा होणार, ओटीटीच्या वादळापुढे सिनेमागृहांचा टिकाव लागणे आता अशक्य आहे या मतापर्यंत आलेल्या मनोरंजनसृष्टीतील अनेकांना आता आशेचा नवा किरण दिसू लागला आहे. 'ब्रह्मास्त्र' चित्रपटाने आता २६ ते २९ सप्टेंबर दरम्यात तिकिटांचे दर १०० रुपये ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढेही तिकिटांचे दर असेच ठेवा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. भविष्यात प्रेक्षक टिकवण्यासाठी सिनेसृष्टी कोणती पावले उचलते यावर त्यांची भविष्यातील वाटचालही अवलंबून असणार आहे. प्रेक्षक सिनेमा पाहण्यासाठी नक्कीच सिनेमागृहापर्यंत येऊ शकतात हे यानिमित्ताने अधोरेखित झाले. परंतु आता तिकीट दर पुन्हा पूर्ववत झाल्यांनतर शनिवार, रविवारी सिनेमागृहावरील प्रेक्षकांची गर्दी ओसरली. त्यामुळे आता हा 'किमान' किमतीचा प्रयोग दररोज करण्याबाबत सिनेनिर्माते आणि सिनेमागृह व्यावसायिकांमध्ये चर्चा रंगत आहे. हा उपक्रम नव्या स्वरूपात कसा राबवला जाऊ शकतो, याबाबत विचारविनिमय सिनेसृष्टीने करणे गरजेचे. यात प्रत्येक सिनेमागृहात प्रत्येक सिनेमाचा दिवसातील किमान एक खेळ (शो) ७५ रुपये किंवा कमी तिकीट दरात उपलब्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे असू शकते का? किंवा सवलतीच्या दरात मासिक तिकीट सुरू करणे या पर्यायांचा विचार सिनेव्यावसायिकांनी करणे गरजेचे आहे. सोबतच प्रेक्षक सिनेमागृहांकडे न येण्याच्या कारणांचाही शोध घेणे आवश्यक आहे. प्रेक्षक सिनेमागृहात चित्रपट पाहण्यासाठी न येण्यामागचे कारण चित्रपटांच्या ढासळणाऱ्या दर्जासोबतच (अपवाद वगळता) तिकिटांचे चढे दर हेही आहे. सध्या बहुपडदा सिनेमागृहांमध्ये एका व्यक्तीचे तिकीट हे २५० ते अगदी एक हजार रुपयांपर्यंत जाते. मध्यंतरामध्ये खाण्याचे दर पाहूनच अनेकांचे पोट भरते. त्यामुळे चार जणांच्या कुटुंबांने एकत्रित चित्रपट पाहायला म्हटला तर किमान दोन ते अडीच हजार रुपये खर्च होतात. एवढा खर्च करून सिनेमागृहांमध्ये जाण्याऐवजी घरी बसून 'ओटीटी'वर विविध पर्याय शोधण्याकडे प्रेक्षकांचा कल वाढला आहे. करोनाकाळात ओटीटीने प्रेक्षकांना, विशेषतः तरुण वर्गाला आपल्याकडे ओढले हे सत्य नाकारता येणार नाही. मुंबईतील अनेक एकपडदा सिनेमागृहे सध्या अंतिम घटका मोजत आहेत. त्यांना नवसंजीवनी देण्यासाठी आणि प्रेक्षकांना पुन्हा सिनेमागृहकडे वळवण्यासाठी हीच योग्य वेळ असू शकते. मुंबईचे एके काळचे वैभव असलेल्या एकपडदा सिनेमागृहांना पुन्हा झळाळी येऊ शकेल आणि प्रेक्षकही चित्रपट पाहण्यासाठी सिनेमागृहाकडे वळतील, या दृष्टीने राज्य सरकारनेही ठोस सांस्कृतिक धोरण लवकरात लवकर अंमलात आणण्याची आज गरज आहे. सिनेमागृहातील 'बॉक्स ऑफिस कलेक्शन'ची प्रामुख्याने सिनेनिर्माता आणि सिनेमागृह व्यावसायिक यांच्यामध्ये विभागणी होते. हिंदी चित्रपटांची ही विभागणी बहुतांश वेळा बरोबरीची असते, तर मराठी चित्रपटांच्या बाबतीत अनेकदा या विभागणीत सिनेमागृह व्यावसायिकाचे पारडे अधिक जड असते. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात सिनेमागृहांसाठी सर्वसमावेशक धोरण आणणे सयुक्तिक ठरेल; जेणेकरून मराठी, हिंदी किंवा इतर भाषक सिनेमांना समान संधी सिनेमागृहांवर मिळू शकेल. आगामी काळात मागणी आणि पुरवठ्यानुसार सिनेमागृहे त्यांची तिकिटे कमी-अधिक करू शकतात. कारण, आज 'ओटीटी'सारखे सिनेमा प्रदर्शनाचे सक्षम साधन सिनेनिर्मात्यांच्या हाती असल्याने एकूण सिनेनिर्मितीतील वीस-तीस टक्के सिनेमे थेट ओटीटीचा मार्ग धरताना दिसत आहेत. या स्थितीत तिकिटांच्या किमती कमी करणे हा एक उपाय असू शकतो हे या प्रयोगाने दिसून आले. तो अधिक काळ राबवला गेला तर सिनेमागृहांना तोटा होईल, असे काहींना वाटते, त्यात फार तथ्य नाही. कारण, मल्टिप्लेक्समध्ये तिकिटविक्रीतून होणाऱ्या उत्पन्नापेक्षा खाद्यपदार्थ विक्री आणि जाहिराती यातूनही चांगली मिळकत होत असते. महाराष्ट्रात मुंबई आणि उपनगर, नाशिक, नागपूर, पुणे, कोल्हापूरसारख्या बड्या शहरांमध्ये मराठी सिनेमांची हिंदी सिनेमांशी प्रामुख्याने स्पर्धा असते. तिकीट दर कमी केल्याचा मराठी सिनेमाला उपयोग होईल, असाही एक सूर मराठी निर्मात्यांमधून उमटतोय. मात्र '७५ रुपयांत चित्रपट' कायमच पाहायला मिळू लागले तर रोज अशी गर्दी होईल, असे अजिबात नाही. हिंदी आणि मराठीचाही व्यवसाय मंदावला असताना आणखीही पर्यायांचा शोध घ्यावा लागणार आहे. 'मोठ्या पडद्यावरच पहायला हवेत' अशा चित्रपटाच्या निर्मितीत वाढ होणे, व्हीएफएक्ससारख्या तंत्राचा वापर वाढवणे आणि भव्य तरीही अर्थपूर्ण मनोरंजनाकडे लक्ष देणे असे बदल चित्रपट निर्मितीत होणे गरजेचे आहे. किमती कमी करण्याचा प्रयोग मोठ्या दुखण्यावरचा तात्पुरता इलाज आहे.

# एमसीसीएच सोसायटी मित्र मंडळ पनवेल आयोजित झंकार नवरात्रोत्सवाला दिमाखात सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास सोसायटी मित्र मंडळ पनवेल आयोजित 'झंकार नवरात्रोत्सव २०२२' या नवरात्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आज (सोमवार दि.२६ सप्टेंबर) घटस्थापना झाली असून भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व पत्नी वर्षा प्रशांत ठाकूर यांच्याहस्ते देवीची प्रतिष्ठापना करण्यात आली. आजपासून ५ ऑक्टोबरपर्यंत पनवेल शहरातील मिडलक्लास सोसायटी मैदानावर रोज संध्याकाळी ७:३० वाजता लाईव्ह दांडिया नाईटचे आयोजन करण्यात आले आहे. यासह प्रत्येक दिवशी १०० विजेत्यांना आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. तर शेवटच्या दिवशी महाविजेत्याला 'स्कुटी' दुचाकी बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे.



झंकार नवरात्रोत्सव पनवेलमधील सर्वात मोठा नवरात्रोत्सव मानला जातो. गेली १६ वर्षे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व नेतृत्वाखाली अत्यंत नियोजनबद्ध व शिस्तबद्धरित्या नवरात्रीचा उत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला जातो. कोरोनामुळे गेली दोन वर्षे निर्बंध असल्यामुळे नवरात्रीचा सण साजरा करता आला नाही. मात्र यंदा कोरोनाने काढता पाय घेतल्यानंतर निर्बंधमुक्त नवरात्रोत्सव साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे नवरात्रोत्सव मंडळासह देवी भक्तांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

यावर्षी नवरात्रोत्सव सणानिमित्त विविध कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे. यात प्रामुख्याने दि.२६ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १० वाजेपर्यंत दांडिया रास, २९ सप्टेंबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १० वाजेपर्यंत 'रेट्रो/बॉलिवूड नाईट' या थीम वर आधारित वेशभूषा व नृत्य, ३० सप्टेंबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १२ वाजेपर्यंत पारंपरिक थीमवर (मराठी, गुजराती, राजस्थानी, पंजाबी इत्यादी) आधारित वेशभूषा व नृत्य, १ ऑक्टोबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १० वाजेपर्यंत समूह स्पर्धा, २ ऑक्टोबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १० वाजेपर्यंत फॅन्सी ड्रेस स्पर्धा, ३ ऑक्टोबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १२ वाजेपर्यंत कपल स्पेशल, ४ ऑक्टोबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १२ वाजेपर्यंत महाअंतिम स्पर्धा आणि ५ ऑक्टोबर संध्याकाळी ७:३० ते रात्रौ १० वाजेपर्यंत दसरा साजरा करण्यात येणार आहे.

यावर्षी दांडिया रास गरब्यानिमित्त श्री स्वामी इव्हेंट्स प्रस्तुत 'एक्स्प्रेस दांडिया' या बहारदार लाईव्ह दांडिया नाईटचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात पार्श्वगायक/संगीतकार स्वप्नील गोडबोले, सुप्रसिद्ध गुजराती गायक हरीश ठक्कर, सुप्रसिद्ध गायिका कोमल तेंडुलकर, झी मराठी सारेगम फेम गायिका रुपाली वराडकर, सोनी मराठी वाहिनीवरील महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातील वादक श्याम बांगर, सुनील जाधव (बाबा), साहिल रेळेकर यांच्यासह संपूर्ण वादकांचा समूह दसऱ्यापर्यंत लाईव्ह दांडिया नाईटद्वारे प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत. तर महाराष्ट्राची हास्यजत्रा कार्यक्रमाचे संगीतकार अमीर हडकर हे स्वतः दसऱ्याला दांडिया नाईटमध्ये खास उपस्थित राहणार असून मनोरंजन करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नूतन पाटील करणार आहेत. या सर्व कार्यक्रमांना सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सभागृहनेते परेश ठाकूर, एमसीसीएच सोसायटी अध्यक्ष राजू गुप्ते, एमसीसीएच सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमीत झुंजारराव यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणीने केले आहे.

# पनवेल- उरण येथील मनसेच्या महिलांच्या नियुक्त्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज ठाकरे यांच्या आदेशानुसार पनवेल- उरण येथील मनसेच्या महिलांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर , महिला जिल्हाध्यक्षा आदिती सोनार, जिल्हा सचिव केसरी पाटिल, योगेश चिले पनवेल महानगरपालिका अध्यक्ष प्रवक्ते याच्या उपस्थितीत पनवेल महानगर, करंजाडे व उरण या कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या अंतर्गत नेमणूका करण्यात आल्या आहेत.



पनवेल महानगर अध्यक्षा प्रिती सिध्देश खानविलकर, स्नेहल दादासाहेब बागल-शहर सचिव, आशिता अंकूर पाटील-शहर सचिव, अंकिता सुनिल चव्हाण-शहर सचिव, प्रज्ञा पंकज पाटील - कामोठे, पुनम प्रदिप यादव - नविन पनवेल, चंचला संदेश बनकर- खारघर, योगिता संदिप गुंजाळ - पनवेल शहर, सोनल प्रशांत कदम - कळंबोली, वृषाली सुशांत मिसाल- करंजाडे शहर अध्यक्षा, स्नेहा किशोर घोडके - करंजाडे उपशहर अध्यक्षा, उपजिल्हा अध्यक्षा व तालुका प्रभारी वर्षा गुलाब पाचभाई पनवेल विधानसभा, रेखा संतोष पवार- उपजिल्हा अध्यक्षा, उरण विधानसभा, स्वरुपा संजय सुर्वे-पनवेल तालुका सचिव, सपना उमेश सोंडकर-उप तालुका अध्यक्षा, रोहिणी महेश पाटील-उप तालुका अध्यक्षा, सुप्रिया राजेश सरफरे-उरण शहर अध्यक्षा, कविता राकेश म्हात्रे- उरण तालुका उपाध्यक्षा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## नवी मुंबईतील खिंडार पवारांनी दहा दिवसात बुजवले

नवी मुंबईत रसातळाला गेलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसची अवस्था बिकट झाल्याची चर्चा होती. अशोक गावडे हे गेल्या काही दिवसांपासून नवी मुंबई बाहेरील नेत्यांच्या हस्तक्षेपमुळे नाराज होते. त्यांनी अधूनमधून आपली नाराजी उघडपणे मांडलीही होती, मात्र नेते मंडळींनी दुर्लक्ष केल्यामुळे मला पक्ष सोडावा लागतोय, असं सांगत त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता.

# म्हसळयातील दोन गुन्हेगारांना दोन महिन्यांसाठी ८ तालुक्यातून हद्दपार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

चोरी, दमदाटी आदि प्रकरणात म्हसळा पोलिस ठाण्यात वेगवेगळ्या गुन्ह्यांखाली कारवाई झालेल्या दोन सराईत गुन्हेगारांना म्हसळा पोलिस ठाण्याचे वतीने मा.उपविभागीय दंडाधिकारी श्रीवर्धन यांच्याकडे गुन्हेगारांना चांगलीच अद्दल घडली पाहिजे म्हणुन हद्दपार प्रस्ताव सादर केला असता तो मा. उपविभागीय दंडाधिकारी यांनी प्रारीत करून नविद अब्दुल हमीद दोंदीलकर राहणार सानेआळी, म्हसळा आणि उमेश प्रकाश भानसे राहणार न्यू इंग्लिश स्कूल शेजारी या दोन इसमांना रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा, महाड, पोलादपूर, मुरुड या ८ तालुक्यातून दोन महिन्यांकरिता हद्दपार केले असल्याची माहिती स.पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी दिली आहे. हद्दपार इसमांवर जा/क्र/४८५/एलसीबी/हद्दपार प्रस्ताव/२०२२-८९६ व ८७५ दिनांक ०४/०४/२०२२ व २९/०३/२०२२ मुंबई पोलिस अधिनियम १९५१चे कलम ५६/१/अ,अन्वये हद्दपार प्रस्ताव मा.उपविभागीय दंडाधिकारी श्रीवर्धन यांना सादर केला असता त्यांनी सदरचा प्रस्ताव जावक क्रमांक ६/२२ व ५/२२ दिनांक १६/०९/२२ रोजी नविद दोंदीलकर आणि उमेश भानसे या दोन इसमाना दोन महिन्यांकरिता हद्दपार करण्याचे आदेश पारित केले त्या नुसार आदेशाची बजावणी म्हसळा पोलिस ठाण्यामार्फत कार्यान्वीत केली असल्याचे सांगणयात आले. हद्दपार इसमाना वरीप्रमाणेच नमुद तालुक्याचे बाहेर सोडण्यात आले असून ते ज्या पोलिस ठाण्याचे हद्दीत रहावयास जाणार आहेत त्या संबंधित पोलिस स्टेशनला म्हसळा पोलीसांनी त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी लेखी पत्र पाठवून निदर्शनास आणून दिली असल्याचे स. पोलिस निरीक्षक संदीपान सोनवणे यांनी माहिती दिली.

# पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभव यातील अंतर कमी होईल : डॉ.महेंद्र कल्याणकर



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

गुंतवणूकवृद्धी, निर्यात, व्यवसाय सुलभीकरण व एक जिल्हा एक उत्पादन या विषयांचा अंतर्भाव असलेली एकदिवसीय जिल्हा निर्यात कार्यशाळा जिल्ह्यातील सर्व सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योग क्षेत्रातील निर्यातक्षम उद्योजकांना मार्गदर्शन व्हावे, याकरिता आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव यातील अंतर कमी होऊ शकेल, असा विश्वास जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी आज येथे व्यक्त केला.

उद्योग विभाग, उद्योग संचालनालय आणि लघुउद्योग विकास बँक ऑफ इंडिया आयोजित गुंतवणूक, आयात-निर्यात, व्यवसाय सुलभीकरण, आणि एक जिल्हा एक उत्पादन या विषयावरील जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित जिल्हा निर्यात कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते आज संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी बँक ऑफ इंडियाच्या क्षेत्रीय प्रबंधक श्रीमती शंपा बिश्वास, विदेश व्यापार महासंचालनालयाचे महासंचालक सुदर्शन येलाराम, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या, जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, पणन महामंडळाचे उपमहाव्यवस्थापक भास्कर पाटील, पनवेल सहकारी औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष विजयकुमार लोखंडे, आर्कोस इंडस्ट्रियल इस्टेटचे मारुती पवार, मैत्री संस्थेचे नोडल ऑफिसर तथा सहसंचालक श्री.कुंभलवार, लघु उद्योग विकास बँकेच्या (ड्खउ्इख) श्रीमती नीतू थारकन, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी, इंजिनिअरिंग एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलचे स्वप्निल बोभाटे, मरीन प्रॉडक्ट एक्सपोर्ट डेव्हलपमेंट अथॉरिटीचे श्रीमती मंगल पाटील, जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक शामकांत चकोर, आंबा निर्यात उद्योजक श्री.संदेश पाटील, जिल्ह्यातील निर्यातक्षम कृषी उत्पादन जसे पांढरा कांदा व हापूस आंबा तसेच मत्स्य प्रक्रिया उद्योग करणारे उद्योजक व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत लाभ घेतलेले नवउद्योजक, आदी उपस्थित होते.


मे.गुन्नाल सो. यांचे कोर्टात

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.शशिकांत द. ढवळे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३७२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०८/११/२०२२

श्रीमती.कुसूम सुदाम पाटील व २ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ चे पती आणि अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.सुदाम रामा पाटील हे दि.२०/०६/२०२१ रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे येथे मयत झालेले असून त्यांची आई कै.पदी रामा पाटील ही देखील दि.०९/०५/१९८९ रोजी मौजे : शिवकर येथे राहत्या घरी मयत झालेली आहे. त्याचप्रमाणे कै.सुदाम रामा पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांना हिंदू वारसा अधिनियमाप्रमाणे अर्जदार क्र.१) श्रीमती.कुसूम सुदाम पाटील (पत्नी), २) श्री.श्रीपाद सुदाम पाटील (मुलगा), ३) श्रीमती.वंदना सुदाम पाटील (मुलगी) अनु क्र.१ ते ३ सर्व रा.मु. शिवकर, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड हेच प्रथम श्रेणीतील कायदेशीर वारस असून या अर्जदारांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही मुले अथवा मुली वारस नव्हते व नाहीत.

कै.सुदाम रामा पाटील यांच्या मालकीची खालील वर्णनाची चल संपत्ती आहे. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

**कॅनरा बँक, शाखा : चिखले येथील कै.सुदाम रामा पाटील यांचे नावे असलेले बचत खाते क्र.१५०११०१००५४७१ मधील रक्कम रु.६४,८९१/- अगर असलेली एकूण रक्कम**

कै.सुदाम रामा पाटील यांच्या मालकीची वरीलप्रमाणे नमूद केलेल्या चल संपत्तीबाबत वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार क्र.१ ते ३ यांनी दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३७२/२०२२ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व. स्तर यांचे कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत अर्जदार हे कै.सुदाम रामा पाटील यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला / सक्सेशन सर्टीफिकेट दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.२६/०९/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गुन्नाल सो

**ॲड.विलास पाटील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) साहेब यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३६४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२४/११/२०२२

सौ.जयश्री विजय खोडबोले
वय : ६३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.फ्लॅट नं.६०३, हरी निवास, प्लॉट नं.५५,
सेक्टर ३४, कामोठे, नवी मुंबई — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात कै.सुनील विजय खोडबोले यांचे वारस म्हणून वारसदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

कै.सुनील विजय खोडबोले यांचा मृत्यू दि.०५/०१/२०२० रोजी अपोलो हॉस्पिटल इंटरप्रायजेस लिमिटेड, प्लॉट नं.१३, सेक्टर २३, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे झाला आहे. कै. सुनील विजय खोडबोले यांच्या मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची सदनिका मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका नं.६०३, ६ वा मजला, प्लॉट नं.५५, सेक्टर नं. ३४, ''हरी निवास'' बिल्डींग, नोड कामोठे, नवी मुंबई**
**कारपेट क्षेत्रफळ : ३९.८८२ चौ.मी.**
**बिल्टअप क्षेत्रफळ : ४७.८५ चौ.मी.**
**टेरेस क्षेत्रफळ ४.८० चौ.मी.**

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २३/०९/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Shri Gunnal Saheb Court
Advocate For the applicant
Mr.Hardik C Shah

**PUBLIC NOTICE**

BEFORE THE HONOURABLE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, RAIGAD AT PANVEL
CMA 1352/2022
Exibit 7D
N.D. 19/11/2022

Mrs Valsala Vasudevan Pillai …Applicant

**SCHEDULE OF THE PROPERTY**

A) PPF account/s

| Source | Account number | Amount in Rupees |
|---|---|---|
| PPF account number in SBI account (Old Panvel Branch) | 30916992059 | 10,77736.00 |

NOTICE is hereby given public at large that:
All the above Applicants have applied for the Succession/ heirship certificate of the deceased. Deceased Late. Mr Vinod Vasudevan Pillai died intestate on 31st January 2022 at Village Jhadeshwar, Talluka Bharuch, District Bharuch, Gujarat. Mr Vinod Vasudevan Pillai was owner of the property mentioned in the above schedule. Applicants have filed for the Heirship /succession certificate of late Mr Vinod Vasudevan Pillai before the Civil Judge Senior Division at Panvel. ALL PERSONS other than applicants having any claim against, in, to or upon the above said property or having any objection with respect to the application for Heirship/ succession Certificate by way of inheritance agreement, contract, sale, mortgage, possession, gift, lease, lien, charge, trust, maintenance, easement or otherwise howsoever are hereby required to notify the same in writing along with the supporting documentary evidence in the Court of Civil Judge Senior Division (S.D) Panvel, on 19/11/22 at 10.30am hereof otherwise it will be deemed that there is no objection for issue of the Heirship Certificate on the name of proposed applicant herein. It is to note that the objection raised after the completion of said period/date will not be considered.

The said paper notice is signed and stamped by me on 22/09/22
Panvel
Date: 22/09/22

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर मोकाट गुरांचा सुळसुळाट

## या गुरांना कोणी वाली आहे कि नाही? प्रवासी वाहन चालकांचा संताप सवाल

**दै.रायगड नगरी । खोपोली**



जुन्या मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर वनविभाग चेक नाक्या समोरील रस्तेच्या मध भागी मोकाट गुररे ठिय्या मांडून बसत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. महामार्गावरील अनेक ठिकाणे तर दिवसाढवळ्या तसेच रात्रीसुद्धा मोठ्या प्रमाणात मोकाट गुरांचा वावर पहायला मिळतो. जणु काही या गुरांनी रस्त्यावर रास्ता रोकोच केला आहे. रस्त्यावरील वाढत्या मोकाट गुरांच्या वाढत्या संख्येमुळे वाहनचालकांना वाहने चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण तर होतोच आहे मात्र, अपघात देखील होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. पावसात गाडीचा ब्रेक तेवढा लागत नाही. अशावेळी मोकाट जनावरे अचानक गाडीसमोर येतात. यामुळे गाडी सरळ जाऊन जनावरांना धडकण्याची भीती आहे. प्रशासनाने या मोकाट जनावरांवर उपाययोजना करावी अशी मागणी पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली भारतचे रायगड जिल्हा संघटक नरेश जाधव यांनी केली आहे.

या मोकाट गुरांच्या दिवसेंदिवस वाढत्या संख्येमुळे या गुरांना कोणी वाली आहे कि नाही? ही गुरे रस्त्यावर अशीच मोकाट सोडून देण्यात आलीत की काय? असा प्रश्न उभा राहिला आहे. या गुरांचे कळपच्या कळप रस्त्यावर उभे राहिलेले असतात. त्यांच्यामागे कोणीही गुराखी वैगरे दिसून येत नाही. तसेच वाहनचालकांना जाण्यासाठी रस्ताच मोकळा नसल्यामुळे गाडीचा हॉर्न वाजवुन सुद्धा गुरे बाजुला होत नसल्यामुळे शेवटी वाहनचालकांना गाडी उभी करुन गाडीतुन उतरून गुरांना बाजुला करावे लागत आहे. ही गुरे ज्यावेळी रस्त्यावर मोकाट फिरत असतात त्यावेळी यांचा कोणीच मालक नसतो. परंतु वाहनाची जर का चुकून एखाद्या गुराला धडक बसून अपघात घडतो त्यावेळी मात्र अनेक जण मी या गुरांचा मालक असल्याचे सांगत असतात.

तसेच या उनाड गुरांच्या रस्त्याच्या मधोमध बरेच वेळा झुंज होत असतात. या झुंजीमुळे अनेक गाड्यांना अपघात होऊन गाडीचे शो, क्लज, इंडिकेटर पुर्णपणे तुटुन वाहन चालकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या घटना बऱ्याच वेळा घडल्या आहेत. त्यामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात फिरणार्या मोकाट गुरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी वाहन चलकांतून होत आहे.

# दुचाकीच्या अपघातात १ ठार १ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव वेगाने जाणाऱ्या मोटरसायकल वरील चालकाने समोरून येणाऱ्या दुचाकी वाहनास धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक ठार तर एक जखमी झाल्याची घटना करंजाडे हद्दीत घडली आहे.

इरफान अल्लाउद्दीन अन्सारी याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल वेगाने व हाय गहिने चालून करंजाडे येथील संभव ग्रुप ऑफ बिल्डर्स अँड डेव्हलपर्स च्या कार्यालयासमोरील रस्त्यावर आर ४ येथे सूर्यकांत शिंदे यांच्या गाडीत धडक दिल्याने झालेल्या अपघातात सूर्यकांत शिंदे हे गंभीररित्या जखमी होऊन मयत झाले आहेत तर आरोपी इरफान अन्सारी जखमी झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या नवरात्रोत्सवास प्रारंभ

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज व व्याघ्रेश्वर या देवतांची सोमवार दि. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घटस्थापना करून श्री जोगेश्वरी मातेच्या नवरात्रोत्सवास प्रारंभ करण्यात आला. यावेळी नवरात्रौत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ व देवीचे भक्तगण यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवरात्रोत्सवा निमित्त नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांचे मुखवटे व दागिने सुरक्षित ठिकाणा वरून आज दुपारी गोंधळ्याच्या साथीने वाजत गाजत मंदिरात नेण्यात आले. यावेळी विश्वस्त समितीचे सचिव भाई टके, हरिषशेठ काळे, विलास चौलकर, देवीचे भक्त मधुकर पोवळे, राजेश पोवळे, उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन राऊत, माजी अध्यक्ष बाळासाहेब टके, बिपिन सोष्टे आदींसह उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बुधवार दि. ५ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या नवरात्रोत्सवात दररोज सायंकाळी महाआरती, हरिपाठ, रास गरबा, याबरोबरच भजन, श्री दुर्गामाता सप्तशती पाठ, भोंडला नृत्य, संगीतमय कार्यक्रम, हळदी कुंकू, बासरी वादन तसेच रोज रात्री साडेनऊ वाजता पुणे येथील राष्ट्रीय कीर्तनकार ह.भ.प. ह.भ.प. वासुदेव बुरसे महाराज यांचे कीर्तन याबरोबरच विविध भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन नऊ दिवस करण्यात आले आहे.



नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेच्या नवरात्रोत्सवाच्या दरम्यान शहर व परिसरांतील हजारो भाविक मातेचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात येत असतात. त्यामुळे हा नवरात्रोत्सव सो-हळा यशस्वी होण्यासाठी श्री जोगेश्वरी माता देवस्थानचे विश्वस्त समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन, सचिव भाई टके व विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन राऊत, उपाध्यक्ष रुपेश नागोठणेकर, सचिव मंगेश कामथे, सहसचिवपदी संजय नांगरे, खजिनदार प्रथमेश काळे, सहखजिनदार सुदर्शन कोटकर आदींसह विश्वस्त समिती व उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ मेहनत घेत आहेत.

# कर्जत तालुक्यातील २ ग्रामपंचायतीच्या निवडणूका जाहीर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जून २०२२ ते सप्टेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत.कर्जत तालुक्यातील पोटल आणि पाली या दोन ग्रामपंचायतीच्या निवडणूकस कार्यक्रम जाहीर झाला आहे.

कर्जत तालुक्यातील पोटल आणि पाली या दोन ग्रामपंचायतीसाठी गुरुवार दि.१३ ऑक्टोबर रोजी निवडणूक घेण्यात येणार आहे, त्यासाठी बुधवार दि.२१ सप्टेंबर ते मंगळवार दि.२७ सप्टेंबर पर्यत नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याची मुदत आहे, बुधवार दि.२८ सप्टेंबर रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी होणार आहे, ३० सप्टेंबर रोजी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची मुदत आहे,१३ ऑक्टोबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे, १४ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे.

# नेरे गावातील भात गिरणीच्या बाजूला असणारी डी.पी. बंद, सुरू करण्याची मनसेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नेरे गावातील भात गिरणीच्या बाजूला असणारी डी.पी. गेल्या एक ते दिड महिन्यापासून बंद आहे. त्यामुळे सदर डी.पी. वरील विद्युत भार हा प्राथमिक आरोग्य केंद्र, नेरे येथील असणा-या डी. पी. वर वर्ग केलेला आहे. या डी.पी. वर अतिरिक्त विद्युत भार वाढल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित होणे, अति उच्च दाब किंवा कमी दाबाने विद्युत पुरवठा होणे अशा एक ना अनेक समस्यांचा ग्राहकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तरी पुढील अनर्थ टाळण्यासाठी नादुरूस्त डी.पी. लवकरात लवकर दुरूस्त करून सुरु करावी, अशी मागणी मनसेच्या वतीने विश्वास पुंडलिक पाटील, दिनेश काशिनाथ मांडवकर, विद्याधर यशवंत चोरघे यानी महावितरणकडे केली आहे.

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र नेरे येथील डी. पी. च्या आजुबाजूला खूप मोठया प्रमाणात गवत वाढलेले आहे. त्यामुळे तेथे नागरिक घनकच-याची विल्हेवाट लावत आहेत. घनकच-यामुळे दुर्गंधी व डासांचा मोठया प्रमाणात फैलाव होत आहे. त्याला आळा बसण्यासाठी गवत व कच-याची साफ सफाई करून तेथे डी.पी. च्या चारही बाजूने तारेचे कुंपण घालून घ्यावे जेणेकरून तेथे कोणीही कचरा टाकणार नाही. व त्या डी. पी. पासून कोणालाही धोका निर्माण होणार नाही. भात गिरणीच्या बाजूला असणारी बंद डी.पी. सुरू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली आहे.

---

अॅड.उज्वला अमित दंडवते

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.११६८/२०२२
ने.ता.०६/१०/२०२२

१) श्रीमती.नंदिनी कृष्णा लाड
वय : ७५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्रीमती.विनिता विरेन लाड
वय : ४७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) कुमार साहिल विरेन लाड
वय : १७ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
४) कुमार मानस विरेन लाड
वय : १५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
अर्जदार क्र.३ व ४ चे पालनकर्ता म्हणून
आई श्रीमती.विनिता विरेन लाड
रा.सदनिका क्र.२/१, इगल सी.एच.एस., प्लॉट नं.२३
सेक्टर ३, सिडको कॉलनी, न्यू पनवेल-४१०२०६
५) श्रीमती.संगीता मारुती शेलार
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.सदनिका क्र.०२, ए विंग, कावेरी कॉम्प्लेक्स,
भूखंड क्र.२९५, तक्का, पनवेल-४१०२०६
६) श्रीमती.अनुष्का निलेश माने
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.सदनिका क्र.ए-६०३, मारुती टॉवर सी.एच.एस.,
भूखंड क्र.९, सेक्टर ५, कामोठे, नवी मुंबई-४१०२१८ अर्जदार

अर्जदार क्र.१) श्रीमती.नंदिनी कृष्णा लाड यांचे पती व अर्जदार क्र.२) श्रीमती.विनिता विरेन लाड यांचे सासरे अर्जदार क्र.३) कुमार.साहिल विरेन लाड व अर्जदार क्र.४) कुमार मानस विरेन लाड यांचे आजोबा अर्जदार क्र.५) श्रीमती.संगीता मारुती शेलार व श्रीमती.अनुष्का निलेश माने यांचे वडील श्री.कृष्णा नारायण लाड हे दि.०९/०९/२०१७, पनवेल येथे मयत झाले असून त्यांच्या मालकीची मिळकत खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे परिशिष्ट**

1) The Flat bearing No.2/1, admeasuring 756 Sq. Ft. (super Built up area) in the society known as "Eagle Co. Op. Hsg. Society Limited" Sector-3, New Panvel - Dist. Raigad. (50% Shares)

2) तुकडी सातारा, पोस्ट तुकडी, तालुका जावली पैकी, दु.नि.जावली पैकी, कोट्रोशी येथील मिळकत सदर मिळकत जि. सातारा जिल्हा परिषद सातारा पैकी तालुका पंचायत समिती जावली पैकी ग्रामपंचायत कोट्रोशी यांचे कक्षेतील खालीलप्रमाणे.

| दळे | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| -- | ६१/६ | १-३४ | १-५६ |

वरील सर्व्हे नं.६१/६ मधील सामाईकातील माझे हिश्यातील दोन आणे आठ पैसा हिस्सा क्षेत्र ०-२२ आर ही भात शेती जमीन. तसेच सदरचे सर्व्हे नं.६१/६ मध्ये असणारे जिवंत पाण्याचा झऱ्यातील दोन आणे आठ पैसा हिस्सा यासह

वरील मिळकतीबाबत अर्जदाराचे नावे वारस दाखला मिळणेकामी अर्जदाराने अर्ज केला आहे. तरी वरील मिळकतीबाबत जर कोणाची काही हरकत, हक्क, अधिकार किंवा हितसंबंध अगर तक्रारी असल्यास त्यांनीही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांत या न्यायालयात करावी. वरील मुदतीत कोणाची हरकत वा तक्रार न आल्यास व अर्जदाराचे हक्क शाबीत झाल्यास अर्जदाराचे विनंतीप्रमाणे त्यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दि.७/९/२०२२ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्याने दिले.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अर्जदारातर्फे वकील : अॅड.संतोष पांडुरंग मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३१/१०/२०२२

श्रीमती.प्रतिभा रमेश पटेल
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.सदनिका नं.एफ-३१, ग्रेन मर्चंट
को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२५ आणि २६,
सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३
कु.पवनी रमेश पटेल
वय : १५ वर्षे, व्यवसाय :
रा.सदनिका नं.एफ-३१, ग्रेन मर्चंट
को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२५ आणि २६,
सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३
कु.अगस्त्या रमेश पटेल
वय : ११ वर्षे, व्यवसाय :
रा.सदनिका नं.एफ-३१, ग्रेन मर्चंट
को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२५ आणि २६,
सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयातील दिवाणी चौकशी अर्ज नं.७०/२०२२ नुसार अर्जदार या श्रीमती.प्रतिभा रमेश पटेल, वय : ३४ वर्षे या अज्ञान बालकांच्या आई असून हिंदू मायनॉरिटी अॅक्ट नुसार त्यांच्या नैसर्गिक पालनकर्त्या आहेत.

अर्जदार १) श्रीमती.प्रतिभा रमेश पटेल, वय : ३४ वर्षे, २) कु.पवनी रमेश पटेल, वय : १५ वर्षे, ३) कु.अगस्त्या रमेश पटेल, वय : ११ वर्षे यांच्या हिश्श्याची मिळकत मौजे : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड खालीलप्रमाणे :-

| भूमापन क्र. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भू-धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| १२८ | १ अ+१ क | १ | ०-२१-० | २.३७ |
| पैकी मुंबई-पुणे बायपास संपादीत क्षेत्र ०-११-२ गुंठे वगळून उर्वरित क्षेत्र ०-१०-० गुंठे विक्री क्षेत्र | | | | |

सदर या मिळकतीची विक्रीची परवानगी घेत असून सदर मिळकतीस कोणाचेही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दि.३१/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे, अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन मे.कोर्ट पुढील कारवाई करेल. सदर नोटीस आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्यासह दिले.

दि.२६/०९/२०२२

सही/-
क.लिपीक
अति.जिल्हा.न्या.पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
अति.जिल्हा.न्या.पनवेल

---

अर्जदारातर्फे वकील : अॅड.संतोष पांडुरंग मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.७२/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.३१/१०/२०२२

श्रीमती.प्रतिभा रमेश पटेल
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.सदनिका नं.एफ-३१, ग्रेन मर्चंट
को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२५ आणि २६,
सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३
कु.पवनी रमेश पटेल
वय : १५ वर्षे, व्यवसाय :
रा.सदनिका नं.एफ-३१, ग्रेन मर्चंट
को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२५ आणि २६,
सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३
कु.अगस्त्या रमेश पटेल
वय : ११ वर्षे, व्यवसाय :
रा.सदनिका नं.एफ-३१, ग्रेन मर्चंट
को.ऑ.हौ.सोसायटी, प्लॉट नं.२५ आणि २६,
सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयातील दिवाणी चौकशी अर्ज नं.७२/२०२२ नुसार अर्जदार या श्रीमती.प्रतिभा रमेश पटेल, वय : ३४ वर्षे या अज्ञान बालकांच्या आई असून हिंदू मायनॉरिटी अॅक्ट नुसार त्यांच्या नैसर्गिक पालनकर्त्या आहेत.

अर्जदार १) श्रीमती.प्रतिभा रमेश पटेल, वय : ३४ वर्षे, २) कु.पवनी रमेश पटेल, वय : १५ वर्षे, ३) कु.अगस्त्या रमेश पटेल, वय : ११ वर्षे यांच्या हिश्श्याची मिळकत मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड खालीलप्रमाणे :-

| गांव | भूमापन नं. | हिस्सा नं. | भू-धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| शिवकर | २०७ | - | - | २-२५-० | ११.८१ |
| पैकी पनवेल बायपास संपादीत क्षेत्र (-) | | | | ०-७४-० | |
| मुंबई पुणे पेट्रोलियम पाईप लाईन साठी जमीन वापरेणचा हक्क संपादीत क्षेत्र (-) | | | | ०-१५-७५ | |
| उर्वरित संपूर्ण खरेदी केलेले क्षेत्र | | | | १-३५-७५ | |

सदर या मिळकतीची विक्रीची परवानगी घेत असून सदर मिळकतीस कोणाचेही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दि.३१/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे, अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन मे.कोर्ट पुढील कारवाई करेल. सदर नोटीस आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्यासह दिले.

दि.२६/०९/२०२२

सही/-
क.लिपीक
अति.जिल्हा.न्या.पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
अति.जिल्हा.न्या.पनवेल

---

अॅड.राजकुमार व्ही. जाधव
अर्जदाराचे वकील

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१६६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०९/११/२०२२

कै.आनंदीबाई अनंत बंडा मयतचे वारस
१) श्री.जयवंत अनंत बंडा
वय : ६१ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.गजानन अनंत बंडा
वय : ५९ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.रमाकांत अनंत बंडा
वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ ते ३ सर्व रा.नवघर पाडा, नवघर,
जे.एन.पी.टी., ता.उरण, जि.रायगड
४) श्रीमती.सुरेखा भास्कर पाटील उर्फ
सुरेखा अनंत बंडा
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.२६२४, कोटनाका, ता.उरण, जि.रायगड
५) श्रीमती.लक्ष्मीबाई हरिश्चंद्र मुंडकर उर्फ
लक्ष्मीबाई अनंत बंडा
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.विठ्ठल रखुमाई मंदिर पेठ, कोळखे, ओंगक
कॉम्प्लेक्स, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड
६) सौ.जयश्री राम बंडा उर्फ
जयश्री अनंत बंडा
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नवघर, नवघर पाडा, जेएनपीटी,
ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.आनंदीबाई अनंत बंडा यांची मुले असून अर्जदार क्र.४ व ६ ह्या मुली आहेत. कै.आनंदीबाई अनंत बंडा ह्यांचे निधन दि.१३/०८/२०२० रोजी मु.नवघर, पो. जेएनपीटी, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झाले असून कै.आनंदीबाई अनंत बंडा यांचे पती कै.अनंत गोपाळ बंडा यांचे निधन दि.०५/१२/२००८ रोजी मु.नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेले असून श्री.जयवंत अनंत बंडा व इतर ५ ह्यांनी कै.आनंदीबाई अनंत बंडा यांच्या मालकीची सह हिस्सेदारा समवेत खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

| अनु क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. |
|---|---|---|---|
| १ | | १७९ | १ |
| २ | | १८४ | ३ |
| ३ | | १८४ | ४ |
| ४ | | १८६ | ४ ए |
| ५ | | १८८ | ५ |
| ६ | | १९२ | ६ |
| ७ | | १९६ | ४ |
| ८ | | १९९ | ८ |
| ९ | | २०० | ६ |
| १० | | २०२ | ११ |
| ११ | नवघर ३१/८५ | २०४ | ६ |
| १२ | | २०७ | ११ |
| १३ | | २११ | ९ |
| १४ | | २१९ | १० |
| १५ | | २२१ | ४ |
| १६ | | २२५ | ७ |
| १७ | | २२७ | ३ |
| १८ | | २३७ | २ |
| १९ | नवघर १४२/८५ | २२४ | ७ |
| २० | | २२७ | ९ |
| २१ | नवघर २५१/८५-८६ | १९८ | ७ |
| २२ | नवघर १७५/८५ | २१० | ४ |
| २३ | | २२४ | ५ |
| २४ | | १९४ | ३ |
| २५ | नवघर १४१/८५ | २२१ | ३ |
| २६ | | २३१ | ११ |
| २७ | नवघर १७९ डी | १७९ | ८ |
| २८ | | १८२ | १ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.आनंदीबाई अनंत बंडा यांना भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्री.जयवंत अनंत बंडा व इतर ५ हे कै.आनंदीबाई अनंत बंडा यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतलया नाहीत तर हे कोर्ट श्री.जयवंत अनंत बंडा व इतर ५ यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. आनंदीबाई अनंत बंडा यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२३/०९/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण

# संक्षिप्त...

## कराटे प्रशिक्षक गोपाळ म्हात्रे अनमोल रत्न राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । उरण**

मुंबई चर्चगेट, आय.एम.सी. येथे झालेल्या महाराष्ट्र लोक कल्याण सेवा संस्था, अमरदीप बाळ विकास फाऊंडेशन व आसनास हेल्थकेअर अडुकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय अनमोल रत्न पुरस्काराने विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात असून, विविध प्रकारच्या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्यांना देशातून एकूण ८० जणांना सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये उरण तालुक्यातील सारडे येथील कराटे प्रशिक्षक गोपाळ दिनकर म्हात्रे यांना अनमोल राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## कोप्रोली येथे ई श्रम कार्ड शिबिराला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी ई श्रम कार्ड आवश्यक आहे.वाहतूक क्षेत्रात काम करणाऱ्यांना जास्तीत जास्त विविध योजनांचा लाभ घेता यावा यासाठी भाजपा ट्रान्सपोर्ट सेल उरण तालुक्याच्या माध्यमातून काल सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत उरण तालुक्यातील पूर्व विभागात असलेल्या साईकृपा इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी कोप्रोली येथे ई श्रम कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला जनतेचा, वाहतूकदारांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे.

वाहतूक क्षेत्रात काम करणाऱ्या ड्रायवर यांना ई श्रम कार्ड मोफत काढून देण्यात आले. नागरिकांनी या फ्री ई श्रम कार्ड शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. भाजपा ट्रान्सपोर्ट सेल तर्फे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात अनेक गरजूना मदत झाल्याने सर्वांनी भाजपा ट्रान्सपोर्ट सेलचे आभार मानले आहेत.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपा ट्रान्सपोर्ट सेलचे उरण तालुकाध्यक्ष सुदेश पाटील, साईकृपा इन्फॉरमेशन टेकनॉलॉजीचे राकेश पाटील, ई श्रम कार्ड काढून देणारे ऑपरेटर विकी कोळी तसेच भाजपा ट्रान्सपोर्ट सेलचे सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली.

बापूजी देव टॅक्सी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष मनोहर म्हात्रे,श्री बापूजी देव रिक्षा चालक-मालक संघटना अध्यक्ष गिरीश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या पुतळ्यास आक्कादेवी माळरानावर अभिवादन

**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर येथे २५ सप्टेंबर १९३० रोजी आक्कादेवीच्या माळरानावर ब्रिटिश सत्तेविरुद्ध झालेल्या गौरवशाली व शौर्यशाली चिरनेर जंगल सत्याग्रहात देशाच्या स्वातंत्र्यासाठी आदिवासी समाजातील आपल्या प्राणाची आहुती देऊन हौतात्म्य पत्करलेल्या हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांना अभिवादन करण्यासाठी आक्कादेवीच्या माळरानावर रायगड जिल्ह्यातील जनजाती समाज एकत्र आला होता.

सारसोई आदिवासीवाडी येथून चिर-नेर आक्कदेवीवाडी पर्यंत १५० युवक कृष्णा काळ्या वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली मशाल यात्रा घेऊन आले होते. संपूर्ण जंगलातील समाज या भारत देशाच्या स्वातंत्र्यासाठी येथील संस्कृतीसाठी कशा पद्धतीने लढला याची माहिती सोमय्या जुलू यांनी दिली असून, भारताची संस्कृती टिकून राहण्यासाठी जनजाती समाजाचे मुख्य योगदान राहिले असल्याचे त्यांनी नमूद केले.तर ठमाताई यांनी वनवासी कल्याण आश्रम गेले नऊ दशके जनजाती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विवीध क्षेत्रात काम करत आहे



याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे हुतात्मा नाग्या कातकरी याचे पूर्णकृती पुतळा याच जंगलातील माळरानावर उभा करून दाखवून दिले आहे. शिक्षा हित रक्षा आणि श्रद्धा यांसारख्या विविध आयामानच्या आधारे आज समाजाची सेवा संस्थेच्या माध्यमातून होत आहे.

प्रमुख वक्ते एड. परशुराम पवार यांनी आ-पला समाज पुढे येण्यासाठी आपणच आता चार पावला पुढे यावं लागणार आहेत शिकून कायदे समजून घेऊन आपल्या हिताच्या बाबी समजून घेऊन आपल्याला मिळवाव्या लागतील. वनहक्क कायद्याच्या आधारे जंगलातील असलेल्या वनौषधी यांची वाढ करून येथील साधन संपत्तीचा योग्य प्रकारे उपयोग करून आपली आर्थिक शैक्षणिक व सामाजिक सुधारणा करता येऊ शकते हे स्पष्ट केले.या प्रसंगी हुतात्मा नाग्या कातकरी यांचे वंशज विश्वनाथ नाईक यांचा स्मृतीचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

२५ सप्टेंबर जागतिक फार्मासिस्ट डे चे औचित्य साधून उरण तालुका केमिस्ट असोसिएशन च्या वतीने उपस्थित बांधवाना औषधें सेवन माहिती देण्यात आली व पोटातील कृमी नाशक औषधाचे वाटप करण्यात आले.फार्मासिस्ट उमाकांत पानसरे,फा.बाळू घालवत फा दिलीप ठाकूर , फा बळीराम पेनकर ,फा विश्वनाथ पाटील , मदनगिरी उपस्थित शेवटी वनवासी बांधवांनी पारंपारिक नाच गाण्यातून हुतात्मा नाग्या कातकरीचे गुणगान गाऊन अनोखी आदरांजली वाहिली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रमेश फोफेरकर यांनी उरणचे आ. महेश बालदी यांचे उरण ,पनवेल खालापूर येथील वनवासी बांधवांसाठी वाड्यांवर फिरता दवाखाना उपलब्ध करून दिल्या बद्दल विशेष आभार मानले.

कार्यक्रमाला वनवासी कल्याण आश्रम राष्ट्रीय मार्गदर्शक सोमय्या जुलू , प्रांत अध्यक्षा ठमाताई पवार , सुदाम पवार जनजाती सुरक्षा मंच जिल्हा संयोजक, वसंत भाऊ पाटील चिरनेर जंगल सत्याग्रह अभ्यासक, अॅड. परशुराम पवार प्रांत हित रक्षा प्रमुख व आश्रम जिल्हा अध्यक्ष अविनाश म्हात्रे, उरण तालुका अध्यक्ष मनोज ठाकूर यांच्यासह ८०० हुन अधिक आदिवासी समाजात बांधव व महिलांनी हजेरी लावली होती.

## धाटावमधे श्री सोनारसिद्ध महाराजांच्या जयघोषात ग्रामदैवतेची घटस्थापना

**दै.रायगड नगरी । धाटाव**

आज आश्विन शुक्ल पक्ष प्रतिपदेच्या मुहूर्तावर रोह्यातील धाटाव गावचे ग्रामदैवत श्री सोनारसिद्ध महाराजांची असंख्य ग्रामस्थांच्या साक्षीने श्री. सोनारसिद्ध महाराजांच्या जयघोषात धाटावचे उपसरपंच अशोक मोरे यांच्या हस्ते भगवान श्री सोनारसिद्ध महाराजांची घटस्थापना करण्यात आली. दरम्यान झालेल्या स्थापनेने आज पासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला. याप्रसंगी गावातील वातावरण भक्तिमय झाले होते तर ग्रामस्थांमध्येही उत्साह पहावयास मिळाला.



आज सोमवार दी.२६ सप्टेंबर रोजी दू.१२:३० अश्विन शुक्ल पक्ष प्रतिपदेच्या मुहूर्तावर धाटाव गावचे श्रद्धास्थान ग्रामदैवत श्री सोनारसिद्ध महाराजांची उपसरपंच अशोक मोरे यांच्या शुभहस्ते देव-ाची घटस्थापना करण्यात आली. भगवान श्री सोनारसिद्ध महाराज की जय अशा जयघोषात प्रकाश जंगम यांनी केलेल्या विधिवत पूज-ाअर्चा महाआरती झाल्यानंतर ग्रामदेवत आज घटी बसविण्यात आले. मंदिरात ग्रामस्थांनी केलेल्या सोनारसिद्ध महाराजांच्या जयघोषाने सबंध परिसर दणाणुन गेला होता. यासमयी धाटावचे माजी उपसरपंच यशवंत रटाटे, चद्रकांत मालुसरे, खेलु रटाटे, नयन रटाटे, किशोर रटाटे, केशव भोकटे, रमेश भोकटे, महादेव रटाटे, सुर्यकांत मोरे, रूपेश रटाटे, केशव भोकटे, पोलिस पाटिल कृष्ना रटाटे, गणेश म्हसकर, संतोष रटाटे, संजय भोकटे, चंद्रकांत भोकटे, महेंद्र रटाटे, सचिन रटाटे, शाम भोकटे, विनय भोकटे, महेंद्र जंगम, भाऊ शेळके, यांसह गाव कमिटी, जेष्ठ नागरिक, गावातील तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान ग्रामदेवतेच्या नावाचा फलक मंदिराच्या मुख्य दरवाजावर लावण्यात आला. मंदिराला चहूबाजूने रोषणाई करण्यात आली होती,तर सर्वत्र विविध रंगाच्या पताकांनी सजावट केल्याचे पहावयास मिळाले. मंदिरात ग्रामदैवतेच्या घटस्थापना कार्यक्रमाला मोठ्या श्रध्देने, मनोभावे गा-वातील जेष्ठ, श्रेष्ठ मंडळीसह तरुण वर्गाचा व महिलांचा सक्रीय सहभाग आणि उत्साह आनंद घेणारा होता.

## जी एम वेदक कॉलेज ऑफ सायन्स तळा येथे राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा



**दै.रायगड नगरी । तळा**

श्री. गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठानचे जी एम वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे आज राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री. पुरुषोत्तम मुळे सर यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय सेवा योजना ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय सरोदे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यकारी अधिकारी डॉ. नसरीन शेख, डॉ. विवेक राणे, शिक्षक, शिक्षकेतर वृंद व मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक विद्यार्थी सहभागी झाले होते. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी जीवनात स्वच्छतेचे महत्व विषद करते व या निमित्ताने उपस्थितांनी स्वच्छता शपथ घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचे विचार कृतीत आणण्यासाठी कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन केले.

२४ सप्टेंबर १९६९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षां निमित्ताने देशातील विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना सुरू झाली. आज देशातील हजारो महाविद्यालये व लक्षावधी विद्यार्थी या योजनेत सहभागी झाले आहेत. २४ सप्टेंबर हा राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो.

## बंद घराची घरपोडी, लाखोंचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत लाखो रुपयांचा ऐवज व रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली आहे.

शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी येथे राहणारे संजय रीसबुड यांच्या बंद घराच्या दरव-ाजाला असलेले कुलूप अज्ञात चोरट्यांनी कशाने तरी तोडून घरातील लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागिने, हिऱ्यांचे अलंकार व रोख रक्कम असा मिळून जवळपास ४ लाख २४ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सेवा पंधरवड्यानिमित्त पनवेल परिसरात आरोग्य शिबिर, वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत शनिवारी नवीन पनवेलमध्ये आरोग्य शिबिर आणि खांदा कॉलनीत वृक्षारोपण आयोजित करण्यात आले होते. या दोन्ही ठिकाणी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

सेवा पंधरडवड्यानिमित्त नवीन पनवेल सेक्टर २ येथील कर्नाटक हॉलमध्ये मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. शिबिरात ब्लड प्रेशर, ईसीजी, रक्त तपासणी, नेत्र तपासणी व चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अनेक गरजूंनी याचा लाभ घेतला.

या शिबिरावेळी पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारूशीला घरत, स्थायी समितीचे माजी सभापती संतोष शेट्टी, प्रभाग समितीचे माजी सभापती समीर ठाकूर, महिला मोर्चाच्या पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, उद्योजक महेंद्र वावेकर, प्रभाग अध्यक्ष शिवाजी भगत, युवा अध्यक्ष मयूर आंग्रे, बूथ अध्यक्ष देवेंद्र पर, बाबू घाडीगावकर, कुलबिरसिंह चंडोक, संदीप जाधव, तन्मय बिर्जे, विवेक होन, रिमा रावल, यमुना प्रकाशन, किरण सिंह यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

भाजप महिला मोर्चा पनवेल व खांदा कॉलनी



यांच्या वतीने वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. खांदा कॉलनीत झालेल्या या उपक्रमावेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, भाजप महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, सरचिटणीस निता माळी यांच्यासह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सर्वोदय हा महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानातून निर्माण झालेला विचार आहे : महेंद्रशेठ घरत

**दै.रायगड नगरी । उरण**

सर्वोदय विचारांची, तत्वज्ञानाची ओळख व्ह-ावी या अनुषंगाने अखिल भारतीय काँग्रेस कमिटी अंतर्गत सर्वोदय संकल्प तीन दिवसीय शिबिराचे आयोजन रायगड जिल्ह्यात पनवेल तालुक्यातील नेरे येथील शांतीवन मध्ये घेण्यात आले होते. शुक्रवार दिनांक २३सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधी मध्ये हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरात रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्रशेठ घरत सहभागी झाले होते. त्या वेळी ते बोलत होते. त्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले कि आधुनिक समाजा समोरील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक समस्यांच्या सोडवणुकीसाठी गांधी विचारसरणीचा अवलंब करणे म्हणजे सर्वोदय होय. सर्वोदय हा समाजातील सर्वांच्या कल्याणाचा पुरस्कार करणारा विचार आहे. व्यक्तीची सहाय्यता महत्त्वाची मानणारा, आर्थिक व सामाजिक समतेवर आधारलेल्या शासनमुक्त समाजाचा आग्रह धरणारा हा विचार आहे. सत्य व अहिंसेवर आधारित स्पर्धा, विषमता, संघर्ष आणि शोषणाला मुळीच स्थान नसलेली व समाजाच्या अगदी कनिष्ठ पातळीवरील व्यक्तीलाही विकासाची समान संधी उपलब्ध करून देणारी समाजरचना म्हणजे सर्वोदय होय. या विचारात समाज कल्याण साधण्यासाठी भौतिक, आर्थिक व आध्यात्मिक साधनांवर भर देण्यात आला आहे. ज्या समाजात सर्व व्यक्ती व गटांना सूख लाभू शकेल असा समाज सर्वोदय-विचार निर्माण करू इच्छितो.असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. या तीन दिवशीय सर्वोदय संकल्प शिबिरामध्ये रायगड जिल्हा काँग्रेसच्या महिला अध्यक्षा ऍड. श्रद्धाताई ठाकूर, रायगड जिल्हा काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, रायगड जिल्हा युवक काँग्रेस चे अध्यक्ष निखिल डवले, रायगड जिल्हा अल्पसंख्यांक अध्यक्ष अखलाक शिलोत्री, महाराष्ट्र फिशरमॅन अध्यक्ष मार्तंड नाखवा, पनवेल तालुका काँग्रेसचे अध्यक्ष नंदराजशेठ मुंगाजी, पेण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अशोक मोकळ, संदीप पाटील, पनवेल पंचायत समितीचे मा.उपसभापती वसंत काठावले, पनवेल शहर जिल्हा ओबीसी अध्यक्ष वैभव पाटील, वैभव म्हात्रे, रायगड जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष, किरिट पाटील, नयना घरत, बापु मोकल, अविनाश पाटील, सुभाष घरत, मुरलीधर ठाकूर,भरत गायकवाड, जयंता घोपरकर, केसरी नाईक, अरुण म्हात्रे, अरुण पाटील रुकेश काठावले, राजेंद्र भगत, आनंद ठाकूर, अलिबागचे अध्यक्ष प्रज्वल पडोले, दिपक ठाकूर, योगेश रसाळ, विवेक म्हात्रे आदि काँग्रेस कार्यकर्ते व अनेक सामाजिक संस्थांनचे कार्यकर्ते या शिबिरात सहभागी झाले होते. या शिबिराचे आयोजक धवलकिर्ती देसाई (गुजरात), अरविंदकुमार द्विवेदी (सांताक्रुज मुंबई) यांनी केले होते. या शिबिरास मार्गदर्शक म्हणून अमर खानापुरे (लातूर), प्राध्यापक डॉ.प्रमोद ओवलेकर (अमरावती), भूपेंद्रसिंग (राजस्थान ), नितेश बनसोडे (अहमदनगर )यांनी मार्गदर्शन केले.

## दुर्गंधीतुन शाळेला जाणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची नगराध्यक्षांनी घेतली तत्परतेने दखल

### विद्यार्थ्यांची बिकट वाट केली सुकर

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

चांगल्या कामासाठी सकारात्मक दृष्टी व प्रचंड इच्छा शक्तीची गरज असते असच काहिस काम माणगांव नगरपंचायतीचे नगराध्यक्ष व स्वच्छता सभापतींच्या हातुन घडल आहे. माणगांव मधिल कचरा डंपिंगच्या भागात असलेली उतेखोलआदिवासी वाडी आणि या वाडीतील लहान लहान शालेय विद्यार्थी यांचा शाळेत जाण्यासाठी असलेल्या मार्गावर काटेकुटे चिखल संपूर्ण शहरातील कचरा कुजलेली घाण अक्षरशहा सडल्याने यावर वळवळणारे जंतु पडलेली अशी भयंकर अवस्था याबाबत येथिल आदिवासी बांधवांची ही व्यथा पत्रकार कुवेसकर यांनी निदर्शनात आणुन दिली होती.

या गोष्टीचे गांभिर्य लक्षात घेत सर्वपित्री अमावस्ये च्या दिवशी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार व स्वच्छता आरोग्य सभापतीं अजित तार्लेकर, पाणी पुरवठा सभापती राजेश मेहता यांनी उतेखोल आदिवासी वाडी येथिल शालेय विद्यार्थ्यांचा शाळेला जाण्याचा मार्ग सुकर करुन दिला आहे. या ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने, सफाई कामगार व यंत्रणा लावुन तसेच स्वतः जातीने दिवसभर हजर राहुन या आदिवासी वाडीकडे जाण्यासाठी नविन, जवळपास अर्धा कि.मी.चा तात्पुरता का होईना पर्यायी मार्ग करुन घेतला आहे. यामुळे शाळेत जाण्यासाठी या लहान विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळले आहे. तसेच आरोग्यही सुरक्षित राहील असे काम केले आहे.



गेले अनेक दिवसांपासुन या विद्यार्थ्यांची शालेय वाट बिकट झाली होती इतकच नाही तर या वाडीतील लोकांना दैनंदिन कामानिमीत्त वा दुखल खुपल तर दवाखान्यात जाण्यासाठी हीच एकमेव वाट होती तिची अवस्था अत्यंत घृणास्पद आरोग्यास धोकादायक अशी अडथळ्यांची झाली होती. येथिल रहिवाशी सणावारांचे दिवसात या रस्त्याचा नाहक त्रास सहन करत होते पण कोणाकडे न्याय मागणार अशी त्यांची अवस्था झाली होती. यांची मुले शाळेत जाईनाशी झाली म्हणुन एका बांधवाने याच कारणास्तव, मुलगा शाळेत जात नाही म्हणुन त्याला मारल होत. या गोष्टीचा नंतर पश्चाताप होऊन त्याला खुप वाइट वाटलं, तो अक्षरशहा रडला, ही गोष्ट नगराध्यक्ष पवार यांना कळताच त्यांनी तातडीने या ठिकाणी धाव घेऊन त्यांची विचारपूस करुन समजुत घालुन आश्वस्त केले व तात्काळ उपाय योजना केली. यामुळे ज्ञानदेव पवार यांच्यातील संवेदनशील नेतृत्वाची झलक मात्र माणगावकरांनी अनुभवली असल्याचे बोलले जात आहे.